


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक ३००, रविवार १८ ऑगस्ट २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## सैनिक भावांना राणीताईंनी पाठविल्या राख्या!

■ नगर दक्षिणेतील ८ हजार सैनिकांना पोष्टाद्वारे राख्या रवाना
■ राख्यांसोबत खा. नीलेश लंके, राणीताई लंके यांचे पत्रही



नगर : प्रतिनिधी

**देशाच्या संरक्षण सेवेत कार्यरत असलेल्या नगर दक्षिण मतदारसंघातील ८ हजार सैनिकांना जिल्हा परिषदेच्या मा. सदस्या राणीताई लंके यांनी राख्या पाठविल्या असून देशाच्या सीमांचे रक्षण करण्यासाठी जीवाची बाजी लावणाऱ्या या भावांप्रती राणीताईसह खा. नीलेश लंके यांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे.**

गेल्या काही वर्षांपासून खा. नीलेश लंके हे समाजकारण, राजकारणात सक्रीय असून नगर जिल्हयासह राज्यात त्यांचा संपर्क आहे. त्यांच्या अर्धांगिनी जि.प. च्या मा. सदस्या राणीताई लंके यांचाही संपर्क दांडगा असून राणीताई म्हणून त्या परिचित आहेत. खा. लंके यांच्या सहकाऱ्यांसह जिल्हयातील, जिल्हयाबाहेरील लंके यांच्या चाहत्यांसाठी राणीताईचे नाते बहिणीप्रमाणे आहे. याच नात्याची जाण ठेऊन राणीताई यांनी देशाच्या सीमेवर असलेल्या भावांसाठी पोष्टाद्वारे राख्या पाठवून बहिण भावाच्या पवित्र नात्याला उजाळा दिला आहे.

### खा. नीलेश लंके व राणीताई लंके यांनी सैनिक भावांना पाठविलेले पत्र जसेच्या तसे

**प्रिय भावास**

**सस्नेह नमस्कार !**

आम्हाला आपल्याशी या पत्राच्या माध्यमातून संवाद साधताना आनंद होत आहे. रक्षाबंधनाला सीमेवरील जवानांना बहिणीची उणीव निश्चित भासते. या सणाचे आधारस्तंभ म्हणजे प्रेम, पराक्रम, सय्यम आणि साहस होय. रक्षाबंधनाच्या पवित्र सणाच्या निमित्ताने एक बहिण म्हणून मला तुमची आठवण येत आहे.

एक सक्षम भाऊ म्हणून आपण सीमेवर संरक्षणाची जबाबदारी पार पाडत आहात. आपण सीमेवर देशाचे संरक्षण करत आहात म्हणून आम्ही सर्वजण सुरक्षित आहोत. देशासाठी आपले जीवन समर्पित करणाऱ्या सर्व सैनिकांचे आभार. आपण सलग बाराही महिने संरक्षणासाठी सीमेवर डोळ्यात तेल घालून काम करत असतात. त्यामुळे महत्वाच्या सणालाही आपल्या बहिणीच्या हातीने राखी बांधायला येणे शक्य होत नाही त्यामुळे आपल्या लाडक्या बहिणीकडून आपणास राखी पाठवत आहे.

आपण सर्वांनी लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीमध्ये माझ्यावर जो विश्वास दाखविला, जे प्रेम दाखविले त्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत. आपण आमच्यावर जो विश्वास दाखविला आहे त्यास आम्ही तडा जाऊ देणार नाही. आपल्या कुटूंबातील एक सदस्य म्हणून आपण हक्काने आमच्याशी संपर्क साधावा. देश सीमेवर कर्तव्य करत असताना आपल्या काही अडचणी असल्यास, किंवा काही कौटूंबिक अडचणी असल्यास त्या सोडविण्याचा आम्ही दोघेही निश्चितच प्रयत्न करू. आपल्या मदतीसाठी आम्ही दोघेही नेहमी तत्पर राहू.

सुट्टीदरम्यान आपण गावी आल्यावर तुमच्याशी गप्पा मारण्यास व अनुभव समजुन घेण्यास आम्हाला निश्चितच आनंद वाटेल. या रक्षाबंधन सणानिमित्त जो स्नेह निर्माण झाला आहे तो स्नेह तसाच राहून अधिकाधिक वृद्धींगत होत राहावा हीच अपेक्षा.

तुम्हाला रक्षाबंधनाच्या खूप खूप शुभेच्छा! प्रेमाचा हा सण तुमच्या आयुष्यात खूप आनंद आणि **शुभेच्छा घेऊन येवो!**

**धन्यवाद..**

आपली, **रा.नि. लंके** आपला **नि.ज्ञा.लंके**

## नगर जिल्ह्यात यलो अलर्ट जारी

नगर : प्रतिनिधी



**नगर जिल्ह्यात हवामान खात्याकडून यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. विजांच्या कडकडाटासह वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता आहे, असा इशारा भारतीय हवामान विभागाने दिला आहे. त्यामुळे विजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, आपत्तीच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील यांनी केले.**

भारतीय हवामान विभागाने दिलेल्या इशाऱ्यानुसार १७ ते २० ऑगस्टपर्यंत विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस होणार आहे. या कालावधीत शेतकऱ्यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा, जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे. वादळी वारा, मेघगर्जनेसह विजा पडणे व जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात आलेली आहे.

विजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. नागरिकांनी स्थानिक प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे. धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये, मेघगर्जना होत असताना झाडांच्या खाली न थांबता सुरक्षति ठिकाणी आश्रय घ्यावा. नागरिकांनी आपत्कालीन परिस्थितीत नजीकचे तहसील कार्यालय, पोलिस ठाण्याशी अथवा दूरध्वनी क्र. १०७७ (टोल फ्री) वर संपर्क साधावा.

## शिरुरपर्यंत दुमजली उड्डाणपूल उभारणार

### जनसन्मान यात्रेत अजित पवारांची घोषणा

येरवडा : प्रतिनिधी

**पुणे शहर प्रचंड वाढत आहे. वाहतुकीची समस्या गंभीर बनू बनली आहे. नगर रस्त्यावरील बीआरटी पूर्णपणे काढून टाकण्याची, तर काहींची ती कायम ठेवण्याची मागणी जोर धरू लागली आहे. नगर रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यााठी मंत्रिमंडळाची लवकरच बैठक घेणार आहे. पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (पीपीपी) तत्त्वावर विमाननगरपासून थेट शिरूरपर्यंत दुमजली उड्डाणपूल उभारण्याचा निर्णय घेणार आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.**

जनसन्मान यात्रा वडगांव शेरी आली होती. या वेळी अजित पवार बोलत होते. विमाननगर मधील सोसायट्या, पदाधिकारी आणि सामाजिक संस्थांशी त्यांनी संवाद साधला. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, आमदार सुनील




टिंगरे, रूपाली चाकणकर उपस्थित होते.

**अतिक्रमण, वाहतूक मोठी समस्या**

नगर रस्त्यावरील विमाननगर चौकात प्रचंड वाहतूक कोंडीमुळे पाच मिनिटांच्या अंतरासाठी अर्धा तास लागते. विमाननगर परिसरात सर्वत्र फूटपाथ आणि रस्त्यावर अतिक्रमणे झाली आहे. दिवसाढवळ्या वाइन शॉपबाहेर मद्यपी रस्त्यावर दारू पितात. कचराही नियमित उचलला जात नाही. सर्वत्र भटक्या कुत्र्यांचा उच्छाद झाला आहे, अशा समस्या या वेळी नागरिकांनी मांडल्या.

## लाडक्या बहिणीचे पैसे भावाच्या खात्यावर जमा !

### योजनेतील भोंगळ कारभार उघड



यवतमाळ: प्रतिनिधी

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळावा यासाठी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होताच कागदपत्राची जुळवाजुळव करण्यासाठी आटापिटा करावा लागला. अखेर स्वातंत्र्यदिनाला दोन हप्त्याचे तीन हजार रुपये बँक खात्यात जमा झाले असल्याचे मेसेज मोबाईलवर आले. रक्षाबंधन पूर्वीच लाडक्या बहिणींना ओवाळणी मिळाल्याने उत्साहाला पारावार उरला नाही. पण दुसरीकडे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची रक्कम एका पुरुषाच्या खात्यात जमा झाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे या भावाने ना कोणता अर्ज केला होता ना कोणती कागदपत्रे दिली, तरी ती रक्कम त्याच्या खात्यात जमा झाली आहे.**

यवतमाळ जिल्ह्याच्या आर्णी येथील जाफर गफ्फार शेख असे या तरुणाचे नाव आहे. जाफर शेख या तरुणाने साधा अर्जही केला नसताना त्याच्या खात्यात तीन हजार जमा झाल्याने शासनाच्या अजब कारभाराबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे. या प्रकरणमुळे योजनेतील भोंगळ कारभार समोर आला आहे.

जाफर शेख सुशिक्षित बेरोजगार आहे. त्याने लाडकी बहीण योजनेसाठी कोणताही अर्ज केला नसताना त्यांच्या बँक ऑफ बडोदाच्या खात्यात योजनेचे तीन हजार रुपये जमा झाले. खात्यात जमा झालेली रक्कम पाहून तो चक्रावून गेला. योजनेचा लाभ मिळवण्यासाठी महिलांनी दिवसभर रांगेत थांबून अर्ज भरला, कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यासाठी धावपळ केली. मात्र बँक खात्याला आधार लिंक नसल्याने अनेक पात्र महिलांच्या खात्यात रक्कम जमा झालेली नाही. दुसरीकडे कोणताही अर्ज न करता एका उर्वरीत पान ३ वर

## एका तरी बहिणीचा फॉर्म रद्द करून दाखवाच !

### खा.सुप्रिया सुळेंचे थेट चॅलेंज

पुणे :प्रतिनिधी



**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या आजच्या कार्यक्रमाला ज्या भगिनी येणार नाहीत, त्यांचे फॉर्म रद्द होतील, असा धक्कादायक मेसेज पाठवला जात असल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेस : शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी एक्स या सोशल मीडिया अकाऊण्टवरुन केला आहे. हिंमत असेल तर या कार्यक्रमाला न जाणाऱ्या एका तरी बहिणीचा फॉर्म रद्द करून दाखवाच, असे थेट चॅलेंजच सुप्रिया सुळेंनी दिले आहे.**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या रक्कम अदा करण्याच्या कार्यक्रमाला हजर न राहणाऱ्या बहिणींचे फॉर्म रद्द करण्याचे धमकी देणारे हे स्वतः ला भाऊ म्हणवत आहेत. बहिणीला कार्यक्रमाला बोलावणार आणि त्यांची गर्दी दाखवून स्वतःची पाठ थोपटून घेणार, अरे सत्तेत बसलेल्या भावांनो, बहिण-भावाचं नातं एवढं स्वस्त नसतं, असं सुप्रिया सुळेंनी ट्वीट करत ठणकावलं आहे.

बहिणींकडे प्रेमाने काही मागितलं तर बहीण त्याला नाही म्हणत नाही. पण तिला धमक्या देऊ लागलात तर ती कुणालाच घाबरत नाही हे लक्षात ठेवा. हिंमत असेल तर या कार्यक्रमाला न जाणाऱ्या एकातरी बहिणीचा फॉर्म रद्द करून उर्वरीत पान ३ वर




## 'सरकारची धाकधूक आणि पाकपूक वाढली आहे म्हणूनच'

### खा. अमोल कोल्हेंची जोरदार टोलेबाजी

परभणी : प्रतिनिधी

**महाराष्ट्रातल्या जनतेने या सरकारला नापास केलं आहे त्यामुळे सत्ताधाऱ्यांनी दिल्लीतल्या पिताश्रींना सांगून महाराष्ट्रातली विधानसभा निवडणूक पुढे ढकलली आहे अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार अमोल कोल्हे यांनी केली आहे. गेल्या पंधरा वर्षांत पहिल्यांदाच महाराष्ट्र आणि हरियाणा यांची निवडणूक एकत्र होणार नाही हे घडतंय असेही अमोल कोल्हेंनी म्हटले आहे. अमोल कोल्हे यांनी गंगाखेड या ठिकाणी जे भाषण केले त्या भाषणात त्यांनी सरकारविरोधात टोलेबाजी केली आहे.**

गंगाखेडमध्ये शिवस्वराज्या यात्रा पोहचली आहे. या ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या सभेत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे उदाहरण देत अमोल कोल्हेंनी सरकारविरोधात टोलेबाजी केली. तसेच निवडणूक जिंकण्याची धास्ती असल्यानेच



ती पुढे ढकलण्यात आल्याचा आरोप केला आहे.

''जम्मू-काश्मीरच्या सुरक्षा आवश्यकतांमुळे महाराष्ट्रातील निवडणुका नंतर जाहीर केल्या जातील'', असे राजीव कुमार यांनी म्हटलंय. ''महाराष्ट्रात पाऊस आहे. अनेक सण उत्सव आहे. गणेशोत्सव, पितृपक्ष, नवरात्री, दिवाळी हे सण आहे. त्यामुळे येत्या सहा महिन्यांत इथंही निवडणुका होतील'', असेही ते म्हणाले. राज्यातील महायुती व महाविकास आघाडी या दोन्ही आघाड्या निवडणुकीच्या दृष्टीने कामाला लागल्या असून आधी जागावाटप व नंतर उमेदवार निश्चिती अशी प्रक्रियाही सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर एकीकडे लोकसभा निवडणुकांच्या निकालांची अद्याप चर्चा होत असताना विधानसभा निवडणुका मात्र लांबणीवर पडल्या आहेत. यानंतर आता अमोल कोल्हेंनी सरकारवर जोरदार टीका केली आहे.

एकदा एका कॉलेज मालकाचं पोरगं होतं. त्याचा परीक्षेचा नीट अभ्यासच झाला नव्हता. त्या पोराला दररोज वाटायचं की मी परीक्षेत नापास होईल. त्याने बरेच प्रयत्न केले, गाईड आणलं, कॉपी करायची सवय केली, तरीही पोराला खात्री पटलीच नाही की आपण पास होऊ. मग तो त्याने बापाला जाऊन सांगितलं परीक्षा थोडी पुढे ढकला. बापाने विचारलं कशाला पुढे ढकलायची परीक्षा? नियमानुसार परीक्षा झाली पाहिजे. त्यावर तो पोरगा म्हणाला माझा अभ्यासच झाला नाही. तुम्हाला कळलं असेल ना पोरगं कोण ते? असा टोला अमोल कोल्हेंनी लगावला.

सरकारचं धाकधूक उर्वरीत पान ३ वर






# तंत्रमंत्र
विज्ञानयुगातील बितंबातम्या

## गुगलवर फोटो ठेवा सुरक्षित

**सोशल नेटर्किंग माध्यमातून आपले फोटो, व्हिडीओ शेअर करण्याचा ट्रेण्ड आहे. त्यातही सेल्फी काढण्याची हौसही मोठी असते. मात्र, इतक्या संख्येने काढल्या जाणारे, शेअर केले जाणारे फोटो साठवण्याचा आणि ते लगेचच शेअर करण्यासाठी उपलब्ध होण्याचा प्रश्न असतो. हीच अडचण आता गुगलने दूर केली आहे. मित्रमैत्रिणी आणि नातेवाईकांसोबत फोटो, व्हिडीओ शेअर करणे गुगलने सोपे केले आहे. या सर्व गोष्टी तुम्ही आता गुगल फोटो या सेवेद्वारे तुमच्या जी-मेल अकाऊंटशी लिंक असलेल्या क्लाऊडवर साठवून ठेवू शकता. त्यामुळे कोणत्याही गॅझेटवरून एका छोट्या लिंकद्वारे ते इतरांसोबत शेअर करता येईल.**


गुगल फोटो या सुविधेत १६ मेगापिक्सलपर्यंतचे फोटो आणि १०८० पी अर्थात फुल एचडी क्षमतेचे व्हिडीओ साठवून ठेवता येतील. यापेक्षा अधिक क्षमतेचे व्हिडीओ-फोटो असतील तर त्याचे रिझोल्यूशन कमी करून गुगल सेव्ह करून ठेवेल. हे सर्व क्लाऊडवर सेव्ह होणार असल्याने तुमचा मोबाइल, कम्प्युटरमधील मेमरी वापरली जाणार नाही. याअंतर्गत अमर्याद फोटो, व्हिडीओ साठवून ठेवू शकाल. मात्र तुम्हाला १६ मेगापिक्सल किंवा १०८० पी पेक्षा अधिक दर्जेदार व्हिडीओ-फोटो साठवून ठेवायचा असेल तर मात्र गुगलच्या जुन्या सेवेमधील १५ जीबीची जागा वापरता येईल. मात्र, त्यासाठी तुम्हाला ओरिजिनल किंवा हायक्वालिटी प्लॅन यामधून निवड करावी लागेल.

### स्पर्धक कोण?

ॲपल अशाच प्रकारची सेवा देऊ करत असून ती केवळ ॲपलच्या डिव्हाइसवरच आहे. तसेच फोटो साठवण्याची मर्यादित क्षमताच त्यात उपलब्ध आहे. फ्लिकरमध्ये १ टीबीपर्यंतचे फोटो साठवता येतात.

### वापर कसा कराल

मोबाइल, कम्प्युटर, टॅबवरून https://photos.google.com/ ही लिंक ओपन केल्यावर तुम्हाला या सेवेचा लाभ घेता येईल. किंवा गुगल प्ले स्टोअरमधून Photos नावाचे ॲपही डाऊनलोड करून तुम्ही ही सुविधा वापरू शकता.




### गुगलच करणार वर्गीकरण

तुमच्या फोटोचा प्रकार, त्यातील व्यक्ती-ठिकाणे यांचा विचार करून गुगल फोटो त्यांचे स्वतःहून वर्गीकरण करणार आहे. त्यामुळे तुमच्या घराचे फोटो, मुलांचे फोटो, तुमच्या पाळीव प्राण्यांचे फोटो असे वर्गीकरण तुम्ही करण्याची गरज राहणार नाही. हे फोटो सर्च करणेही सोपे असून फोटोतील तुमच्या लक्षात असलेली गोष्ट सांगून तुम्ही सर्च केले की लगेच तशा प्रकारचे फोटो तुमच्यासमोर हजर होतील. यामध्ये फोटो एडिटिंगचीही सुविधा देण्यात आली असून त्यात फोटोचे बेसिक एडिटिंग करता येते. फोटो नेमका कसा आणि कुठे एडिट करायचे हे जर तुम्हाला माहिती नसेल तर त्यात ऑटो फिक्सचा पर्याय देण्यात आला असून याद्वारे तुमचा फोटो गुगलच एडिट करून अधिक चांगला कसा दिसेल, याचा प्रयत्न करते. यात कोलाज, पॅनोरमा, ॲनिमेटेड फाइल तयार करण्याचाही पर्याय आहे. गुगल फोटोमध्ये सेव्ह केलेले व्हिडीओ-फोटो तुम्ही ट्विटर, व्हॉट्स ॲप, फेसबुक वगैरे कुठल्याही ठिकाणी शेअर करू शकाल. त्यासाठी आवश्यक लिंक तयार करण्याचा पर्याय यात देण्यात आला आहे. त्यामुळे गुगल फोटो नसलेल्या व्यक्तीही याठिकाणी सेव्ह केलेले फोटो पाहू शकतील किंवा डाऊनलोड करू शकतील.

# कुठेही असा; संगणक, लॅपटॉप तिथून हाताळा!

**घरच्या अथवा कार्यालयातील संगणकामधील एखादी फाइल आपल्याला अचानक हवी असते. पण त्यावेळेस आपण संगणकाच्या जवळ नसतो. कामानिमित्त बाहेर असतो. जी फाइल हवी ती नेमकी आपल्या मेलमध्ये नसते. अशा वेळी काय करायचे हे आपल्याला सुचत नाही. मग काय करायचे, असा प्रश्न निर्माण होतो. पण तंत्रज्ञानाने यावरही उत्तर काढलेले आहे. आपल्या घरचा अथवा कार्यालयातील संगणक आपण थेट आपल्या हातातील स्मार्टफोन अथवा टॅबशी जोडून संगणकाचा ताबा मिळवू शकतो. हे करण्यासाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत. यातील काही पर्याय पाहू या...**





### क्रोम रीमोट डेस्कटॉप

एखादा पत्ता... बातमी... माहिती... छायाचित्र... आदींचा शोध घ्यायचा झाला तर पटकन गुगलवरच हात जातो. आपल्या घरातील संगणक आपल्या मोबाइलमधून वापरण्याचा पर्यायही गुगलने उपलब्ध करून दिला आहे. सहजता ही गुगलची खासियत असल्यामुळे ही सुविधाही अगदी सोप्या स्वरूपात उपलब्ध करून दिली आहे. विंडोज, मॅक आणि लिनक्स ही ऑपरेटिंग प्रणाली असलेले संगणक अँड्रॉइड आणि आयओएसवर उपलब्ध करून देण्यासाठी गुगल रीमोट डेस्कटॉप ही सुविधा उपयुक्त ठरते. क्रोम रीमोट कसे वापरायचे? जाणून घेऊया. सर्वप्रथम तुमच्या मोबाइल ब्राऊजरमध्ये क्रोम रीमोट डेस्कटॉप एक्स्टेंशन डाउनलोड करून घ्या. हे क्रोमच्या वेब स्टोअरमध्ये उपलब्ध आहे. डाउनलोड झाल्यानंतर अवघ्या काही सेकंदांत ते इंस्टॉल होते. हे करण्यासाठी क्रोमचे लॉगइन असणे आवश्यक आहे. एकदा का तुम्ही हे इंस्टॉल केले की तुमच्या बुकमार्कमध्ये क्रोम रीमोट डेस्कटॉपची लिंक ॲड होते. ज्यावेळेस तुम्ही पहिल्यांदा रीमोट ॲक्सेस घेता त्यावेळेस तुम्हाला एक छोटीशी युटिलिटी डाउनलोड करावी लागते. ही युटिलिटी एका मिनिटापेक्षा कमी अवधीत डाउनलोड होते. यासाठी क्रोम तुम्हाला मदत करते. त्याप्रमाणे करत गेल्यास ती युटिलिटी डाउनलोड आणि इंस्टॉल होते. युटिलिटी इंस्टॉल झाल्यानंतर क्रोम रीमोट डेस्कटॉप तुम्हाला एक पिन देण्यास सांगतो. तुम्हाला पाहिजे तो पिन देऊन तुम्ही तुमचा रीमोट ॲक्सेस सुरक्षित करत असता. एकदा का तुम्ही पिन टाकला की काही वेळातच तुमचा संगणक रीमोट ॲक्सेसच्या यादीत येतो. म्हणजे तुमच्या मोबाइलमध्ये माय लॅपटॉप आणि माय डेस्कटॉप असा पर्याय येतो. हे झाल्यावर तुमच्या संगणकावर तुम्ही क्रोमचे रीमोट डेस्कटॉप एक्स्टेंशन डाउनलोड करून घ्या. त्यानंतर ते तुम्ही सुरू केल्यावर तुम्हाला तुमच्या संगणकाची यादी दिसेल. त्यातील पर्याय निवडला की तो मोबाइलशी जोडला जाईल. ही जोडणी करत असताना तुम्हाला पिन विचारला जाईल. मोबाइल ॲपमध्ये दिलेला पिन इथे दिला की तुमची जोडणी पूर्ण होते. पिन दिल्यावर तुम्हाला हा पिन सेव्ह करायचा आहे का? असे विचारले जाते. मात्र तसे करू नका. जोडणी पूर्ण झाले की तुमच्या फोनमध्ये डेस्कटाप दिसू लागतो.

### वापरा टीम व्ह्यूअर

सर्वांकडेच क्रोम ब्राऊजर असतेच असे नाही. अनेक कार्यालयांत फायरफॉक्स वापरले जाते. यामुळे तुम्ही क्रोम रीमोट डेस्कटॉप वापरू शकत नाहीत. यामुळे तुम्ही टीम व्ह्यूवर या ॲपचा वापर करू शकता. क्रोम रीमोट डेस्कटॉपप्रमाणे तुम्ही विंडोज, मॅक, अँड्रॉइड, आयओएस, लिनक्स यासाठी हे ॲप वापरू शकतो.



याचबरोबर इतरही ऑपरेटिंग प्रणालीसाठी याचा वापर होतो. मात्र हे वापरणे क्रोम रीमोट डेस्कटॉपपेक्षा थोडे अवघड आहे. सर्वप्रथम तुम्ही संगणकावर टीम व्ह्यूअर संकेतस्थळाला भेट द्या व तेथून टीम व्ह्यूअरची अद्ययावत आवृत्ती डाउनलोड करून घ्या. हे इंस्टॉल होत असताना तुम्ही याचा वापर कशासाठी करणार हे सांगावे लागते. म्हणजे वैयक्तिक उपयोगासाठी असेल तर हे सॉफ्टवेअर मोफत वापरता येते. नाहीतर काही पैसे भरावे लागतात. तुम्ही पर्याय निवडला की काही मिनिटांत इंस्टॉलेशन प्रक्रिया पूर्ण होते. पहिली पायरी पूर्ण झाली की तुम्हाला एक आयडी आणि पिन दिला जाईल. म्हणजे ज्यावेळेस तुम्हाला रिमोट ॲक्सेस हवा आहे त्यावेळेस तुम्हाला आयडी आणि पिन द्यावा लागतो. तेव्हाच तुम्हाला मोबाइलवर ॲक्सेस मिळू शकतो. सुरक्षेच्या दृष्टीने हे योग्य असले तरी ज्यावेळेस आपल्याला ॲक्सेस हवा असेल तेव्हा एखाद्या व्यक्तीला आपल्या संगणकावर लॉगइन करणे आवश्यक असते. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यावर तुमचा संगणक टीम व्ह्यूअरच्या सर्व्हरवर पोहोचतो. यानंतर संगणकाचा वापर मोबाइलवर करण्यासाठी तुम्हाला मोबाइलमध्ये टीमव्ह्यूअरचे ॲप डाउनलोड करावे लागेल. यानंतर तेथे असलेला कॉम्प्युटर्स हा पर्याय निवडा. यानंतर तुमच्या लॉगइन आयडीने लॉगइन करा. लॉगइन झाल्यानंतर माय कॉम्प्युटर्स हा पर्याय तुमच्यासमोर येईल. यानंतर तुम्ही तुमच्या संगणकाचा ॲक्सेस मिळवू शकतो. हे लॉगइन करून संगणक सुरू झाल्यावर तुम्ही संगणक वापरत असताना ज्या काही शॉर्टकीजचा वापर करता त्याचा वापर यात करू शकता. ही या सॉफ्टवेअरची जमेची बाजू म्हणता येईल.

# आधारशी लिंक केलेला मोबाईल नंबर चुकीचा?

**आधार कार्ड हे एक महत्त्वाचे दस्तऐवज आहे, जे सर्वत्र वापरले जाते. तुम्ही नवीन नोकरी किंवा शाळा किंवा महाविद्यालयात प्रवेश घ्या किंवा रेल्वे, विमान तिकीट यांसह कोणतेही सरकारी किंवा खासगी काम करायचे असेल तर आधार कार्ड आवश्यक झाले आहे. मात्र, जर तुमचे सिम कार्ड तुमच्या आधारशी चुकीच्या पद्धतीने लिंक झाले असेल तर तुम्हाला तुरुंगात जावे लागू शकते. अशा परिस्थितीत आजच तुमच्या आधार कार्डवर चुकीचा सिम कार्ड क्रमांक नोंदवला आहे का ते तपासा. जर तुमच्या आधारशी बनावट सिम कार्ड लिंक असेल किंवा तुम्ही तुमच्या आधारकार्डसोबत जोडलेले सीम इतर कोणाला दिले असेल तर ते ताबडतोब परत घ्या. अन्यथा तुम्हाला नुकसान सहन करावे लागू शकते... त्या कार्डवरून काही गुन्हेगारी कृत्य घडल्यास त्याचे धागेदोरे तुमच्यापर्यंत येऊ शकतात... त्या परिस्थितीत तुम्हाला स्वतःची सोडवणूक कठीण जाणार आहे...**

### कोणते सिम कार्ड तुमच्या आधारशी जोडलेले आहे? कसे ओळखायचे...

तुमच्या आधार कार्डशी कोणते सिम कार्ड लिंक आहे? हे जाणून घेणे खूप सोपे आहे, जे घरबसल्या ऑनलाइन कळू शकते. सर्वप्रथम तुम्हाला आधारच्या अधिकृत वेबसाइटवर जावे लागेल, म्हणजे UIDAI. त्यानंतर तुम्हाला वरच्या डाव्या कोपऱ्यात My Aadhaar हा पर्याय दिसेल, ज्यावर तुम्हाला क्लिक करावे लागेल. तुम्ही मोबाइलवर आधारची वेबसाइट उघडल्यास, तुम्हाला वरच्या डाव्या कोपऱ्यात तीन ओळी दिसतील, त्यावर क्लिक केल्यावर My Aadhaar पर्याय दिसेल, ज्यावर क्लिक करावे लागेल. त्यानंतर तुम्हाला तळाशी स्क्रोल करावे लागेल, जिथे तुम्हाला आधार सेवा पर्यायावर क्लिक करावे लागेल. यानंतर तुम्हाला Verify ईमेल/मोबाइल नंबरवर टॅप करावे लागेल. त्यानंतर तुम्हाला एक नवीन पेज उघडेल, जिथे तुम्हाला दोन पर्याय दिसतील. यामधून तुम्हाला मोबाईल नंबर चेक करण्याच्या पर्यायावर टॅप करावे लागेल. यानंतर तुम्हाला आधार कार्डचे 12 अंक टाकावे लागतील. त्यानंतर तुम्हाला तुमचा मोबाईल नंबर टाकावा लागेल. यानंतर तुम्हाला कॅप्चा कोड टाकावा लागेल. जर तुमचा मोबाईल नंबर तुमच्या आधारशी लिंक असेल तर तुम्हाला रेकॉर्ड जुळत असल्याची सूचना मिळेल. त्याचप्रमाणे, जर तुमच्या आधारशी इतर कोणताही मोबाइल नंबर लिंक असेल, तर तुम्हाला रेकॉर्ड जुळत नसल्याची सूचना मिळेल.



# विद्यार्थी होतील स्मार्ट..!

**सुरुवातीला कौतुकापोटी चिमुकल्यांना स्मार्टफोन हाताळायला देत असू तरी, नंतरच्या काळात मात्र त्याचा वाढता वापर पाहून आपणच हा स्मार्टफोन त्याच्या हातून काढून घेतो. हाच स्मार्टफोन त्याच्या शैक्षणिक उपयोगीही पडू लागला आणि तसे ॲप्स त्याला समजावून सांगितले, की त्याचाही स्मार्टफोनचा वापर कामाचाच होऊन जाईल...**

### इंटरॅक्टिव्ह विज्ञान संग्रह

जीवशास्त्रशी संबंधित १०० हून अधिक संज्ञा आणि संकल्पना या ॲपमध्ये आपल्याला देण्यात आल्या आहेत. यातील काही संकल्पनांचे छानसे व्हिडीओजही देण्यात आले आहेत. यातील बरीचशी माहिती आपल्याला फ्लॅशच्या मदतीने सांगण्यात आली आहे. यात मानवी शरीर, वातावरण, पेशी असे विविध विभाग करण्यात आले आहेत. हे ॲप माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरू शकणार आहे. यामध्ये प्रश्नावलीही आहे. हे ॲप वापरण्यासाठी आपल्याकडे थ्रीजी किंवा वाय-फायची जोडणी आवश्यक आहे. यातील शब्द शोधण्यासाठी सर्चचा पर्यायही यात देण्यात आला आहे.

### कायम्बू

हे ॲप शिक्षकांना उपयुक्त असून विद्यर्थ्यांच्या विकासासाठी यामध्ये अनेक गोष्टी देण्यात आल्या आहेत. याचबरोबर विद्यार्थ्यांशी नाते कशाप्रकारे अधिक चांगले करता येईल याही बाबतीत काही टीप्स या ॲपमध्ये देण्यात आल्या आहे. यामध्ये कॅमेराचा वापर करून तयार केलेल्या फाइल्स शेअर करणे, हाताने लिहिलेल्या नोटसचे छायाचित्र काढून ते ई-मेलद्वारे पाठविणे या ॲपच्या माध्यमातून अगदी सोपे होते. या ॲपमध्ये दिलेल्या विविध निकषांच्या आधारे पालकांशी संवाद साधून विद्यार्थ्यांचा अभ्यास करून शिक्षक एखाद्या विद्यार्थ्यांचा परिपूर्ण अभ्यास करू शकतात. ज्याचा वापर त्यातील उणिवा भरून काढण्यासाठी होऊ शकतो.

### लुमिबुक


लुमिबुक हे पुस्तके वाचण्यासाठी उत्तम पर्याय ठरू शकते. या ॲपमध्ये आपल्याला आपल्या आवडीच्या लेखकांच्या पुस्तकांचे अपडेटस सातत्याने येत असतात. इतकेच नव्हे तर यात विविध विषयांना वाहिलेले गटही तयार करण्यात आले आहेत. यातील आपल्या आवडीच्या गटात सहभागी होऊन आपण चर्चेतही सहभागी होऊ शकतो. हे ॲप ऑनलाइन क्लाऊडवर आधारित असल्यामुळे आपल्या फोनची मेमरीही कमी खर्च होते. याचबरोबर आपल्याला यात माहिती सातत्याने मिळत राहते.

### ओली सेफ ब्राऊझर

आपल्या मुलांनी वाईट विचारांची संकेतस्थळे पाहू नयेत यासाठी आपण इंटरनेटवर संकेतस्थळे ब्लॉक करून ठेवतो, मात्र मोबाइलवर हे आपल्याला करणे शक्य नसते. यामुळे यासाठी ओली सेफ ब्राऊझर तयार करण्यात आले आहे. या ब्राऊझरच्या माध्यमातून आपल्याला सुरक्षित ब्राऊझिंग करता येते. यात ७०० हून अधिक संकेतस्थळे बंद करण्यात आली आहेत. यातील ब्लॉक लिस्ट आपण आपल्या सोयीने बदलूही शकतो. इतकेच नव्हे तर इंटरनेटचा वापर किती केला याचा हिशेबही या माध्यमातून आपल्याला ठेवता येऊ शकतो. ज्यांना आपल्या ब्राऊझिंगची हिस्ट्री कुणासाठी खुली करावयाची नसेल त्यांनी हिस्ट्रीला पासवर्डही देता येणार आहे.



# लॉकही हवे स्मार्ट




**आपल्या मोबाइलचा गैरवापर कोणी करू नये म्हणून अनेक जण आपल्या स्मार्टफोनला विशिष्ट स्क्रिन लॉक लावतात. या लॉकमध्ये तुम्ही आणखी काही वेगवेगळ्या पर्यायाचा विचार करू शकता.**

सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत आपल्या हातात सतत फोन आणि फोन असतो. काही लोकांना फोनचं व्यसन इतकं असतं की एक मिनिट जरी फोन नजरेआडून गेला तरी जीव कासावीस व्हायला सुरुवात होते. त्यामुळे फोन आपल्या नजरे समोर राहावा, याची जबाबदारी अनेक जण घेतात. त्यातून काही जणांना दुसऱ्याच्या फोनला हात लावून आतमध्ये असणारे मेसेज, फोटो पाहण्याची वाईट सवय असते. असल्यांच्या हाती आपला मोबाइल फोन पडू नये किंवा कोणीही आतमधल्या फोटो किंवा डाटाचा गैरवापर करू नये म्हणून आपण किती खबरदारी घेतो. फोन सुरक्षित राहावा यासाठी मोबाइलमध्ये काही खास सेटिंग असतात. त्यातील एक सेटिंग म्हणजे फोन लॉक करणं किंवा त्याला पासवर्ड ठेवणं. पण बऱ्याचदा आपण आपलं नाव किंवा आपल्या वाढदिवसाची तारीख असाच काही पासवर्ड ठेवतो. त्यामुळे हा पासवर्ड उघडून आतील माहितीचा गैरवापर करणारे अनेक जण आहेत. तुमचा स्मार्टफोन लॉक करण्यासाठी आणि आतील माहिती सुरक्षित ठेवण्यासाठी वेगवेगळे ॲप्स आले आहेत. या ॲप्समध्ये असणारे लॉकर तुमच्या माहितीचा आणि फोटोंचा खजिना सुरक्षित ठेवण्यास मदत करतात. त्यात पॅटर्न लॉक, तुमचा आवाज किंवा बोटांचे ठसे वापरून तुम्ही तुमचा फोन लॉक करू शकतात.




### थीक लॉक...

तुम्हाला तुमच्या फोनसाठी काही वेगळे स्क्रिन लॉक हवे असतील, तर तुम्ही थिम लॉकच्या पर्यायाकडे पाहायला पाहिजे. या थिम लॉकमध्ये सध्या गो लॉकर हे ॲप चांगलंच चाललं आहे. त्याचबरोबर सी लॉकर, थेफ्ट लॉकर, डाय लॉकर असे वेगवेगळे लॉकिंग ॲप्स तुम्ही फोनसाठी वापरू शकता. या ॲप्सनं वेगवेगळ्या प्रकारचे स्क्रिन लॉक तयार केले आहेत. म्हणजे जर तुमचा पॅटर्न लॉक एखादा जबरदस्तीनं उघडू पाहत असेल तर एका ठराविक प्रयत्नानंतर तुमचा फोन बंद होतो. कारण तुमचं पॅटर्न लॉक चुकीचं असतो. मोबाइलच्या सुरक्षेसाठी मोबाइलच बंद होतो, मग हे पॅटर्न लॉक उघडण्यासाठी बऱ्याचदा गॅलरीमध्ये आपली धाव असते. पण काही ॲप्स असे आहेत, ज्यामुळे माहिती नसताना कोणी जबरदस्तीनं तुमचं लॉक उघडू पाहत असेल तर अलार्म वाजायला सुरुवात होते. त्यामुळे गैरवापर करणाऱ्याच्या हातातून तुम्ही तुमचा फोन वाचवू शकता.

### गेमिंग लॉक

तुम्हाला गेमिंग लॉक देखील मिळतील. काही सेकंदाचा गेम खेळायचा आणि खेळ पूर्ण केल्यावर तुमचा मोबाइल ऑन होईल. अशा प्रकारे लॉक ठेवण्याचा एक तोटा असा आहे की तुमचा फोन अनलॉक व्हायला बराच वेळ लागतो. पण मोबाइलचा गैरवापर टाळायचा असेल तर हे अशा पझल्स किंवा गेमिंग लॉकचा पर्याय कधीही उत्तम. असे लॉक उघडण्यासाठी बऱ्याचदा डोकं चालवावं लागतं, त्यामुळे अनेकदा असे विचार करायला लावणाऱ्या वेळखाऊ लॉक उघडण्याच्या फंद्यात कोणी पडत नाही. त्याचप्रमाणे तुमची क्रिएटिव्हिटी उत्तम असेल तर काही ॲप्स स्वत:चे लॉक स्वत: तयार करण्याची सुविधा देखील ग्राहकाला देतात. त्यामुळे तुम्ही तुमचे फोटो, तुमचा पॅटर्न किंवा आवडेल असे विशिष्ट आकार वापरून तुमचे लॉक्स तुम्हीच तयार करू शकता.

### वॉलपेपर लॉक

तुम्हाला अधिक स्मार्ट स्क्रिन लॉकर हवं असेल तर तसेही ॲप्स आहेत. ज्यात प्रथमदर्शी तुमचा फोन अनलॉक केल्यावर एक वॉलपेपर दिसेल. हे वॉलपेपर म्हणजेच लॉक. या वॉलपेपरमधील नेमक्या एखाद्या जागी हे लॉक असेल ते विशिष्ट पद्धतीनं हाताळलं की तुमचा फोन सुरू होईल. म्हणजे बघा, समजा एका झाडाला फळ लागलेला वॉलपेपर असेल तर त्यापैकी एखादं फळ विशिष्ट प्रकारे खाली खेचायचं म्हणजे तुमची स्क्रिन अनलॉक होईल. असेच कार्टूनचे देखील थिम लॉक आले आहेत. कार्टूनची विशिष्ट प्रकारे हालचाल करायची वगैरे वगैरे. नेहमीच्या पॅटर्न लॉकपेक्षा वेगळे पॅटर्न हवे असल्यास या लॉकचा पर्याय चांगला आहे.



## शॉर्ट न्यूज

### राज्यस्तरीय योगासन स्पर्धेचे आयोजन

**संगमनेर :** महाराष्ट्र योगासन स्पोर्ट असोसिएशन व बृहंमहाराष्ट्र योग परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने संगमनेरच्या ध्रुव ग्लोबल स्कूलमध्ये पाचव्या राज्यस्तरीय योगासन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार १६ ते रविवार १८ ऑगस्ट या कालावधीत होत असलेल्या या स्पर्धेत खेलो इंडिया व नॅशनल गेम्स् स्पर्धेत विजेत्या खेळाडूंसह राज्यातील एक हजारांहून अधिक योगासन खेळाडू सहभागी होणार आहेत. योगासनांच्या वेगवेगळ्या चार प्रकारांमध्ये होत असलेल्या या स्पर्धेत सहभागी खेळाडूंसाठी तीन गट करण्यात आले आहे.

### पिंगेवाडीच्या उपसरपंचपदी फरीदा शेख

**शेवगाव :** तालुक्यातील पिंगेवाडी ग्रामपंचायत येथील उपसरपंचपदाची निवडणूक सरपंच उज्वला नंदकुमार मुंढे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच पिंगेवाडीचे ग्रामसेवक आर. आर. राठोड यांच्या उपस्थित पार पडली. यावेळी उपसरपंच पदासाठी फरीदा चांद शेख यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने उपसरपंच पदाची निवडणूक बिनविरोध झाली असल्याचे ग्रामसेवक आर. आर. राठोड यांनी जाहीर केले.

### पतसंस्थेकडून ग्राहकांना मोबाईल बँकिंग सेवा

**कोपरगाव :** सहकारी पतसंस्था क्षेत्रात अग्रगण्य असणाऱ्या कोपरगाव तालुक्यातील गौतमनगर येथील पद्मविभूषण डॉ. शरदचंद्रजी पवार साहेब नागरी सहकारी पतसंस्थेने बदलत्या काळानुसार आपल्या बँकिंग व्यवहारात अमुलाग्र बदल करून संस्थेचे मार्गदर्शक आमदार आशुतोष काळे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत ग्राहकांसाठी मोबाईल बँकिंग सेवा उपलब्ध करून दिली आहे. या सेवेचे उद्घाटन नुकतेच आ. आशुतोष काळे यांच्या हस्ते करण्यात आले.

### म्हाळस पिंपळगाव सेवा संस्था अध्यक्षपदी आहेर

**नेवासा :** तालुक्यातील म्हाळस पिंपळगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या अध्यक्षपदी विठ्ठल जिजाबापू आहेर तर उपाध्यक्षपदी दत्तात्रय मच्छिंद्र कर्डिले यांची बिनविरोध निवड झाली. म्हाळस पिंपळगाव सेवा संस्था अध्यक्ष, उपाध्यक्षपदाच्या निवडीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी वाय, एल. नरसिंगपूरकर यांनी विशेष सभा बोलावली होती. यावेळी अध्यक्ष पदासाठी विठ्ठल जिजाबापू आहेर यांच्या नावाची सूचना बाबासाहेब माणिक कर्डिले यांनी मांडली. अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी एक-एक अर्ज आल्याने दोघांचीही बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.

### चारीला पाणी सुटल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंद

**पाथर्डी :** तालुक्याच्या दुष्काळी भागाला वरदान ठरणाऱ्या वांबोरी चारीला पाणी सोडण्यात आले. मुळा धरण भरल्यानंतर वाहून जाणारे पाणी वांबोरी चारीला सोडल्यामुळे पाथर्डीच्या अनेक गावांतील पिण्याच्या पाण्यासह शेतीच्या पाण्याची अडचण दूर झाली. यामुळे शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. पाणी सोडण्यासाठी पाठपुरावा केल्याबद्दल आ. प्राजक्त तनपुरे यांचे लाभधारक शेतकऱ्यांनी आभार मानले. सुरुवातीच्या काळात भरलेले मुळा धरणातील पाणी जायकवाडीला वाहून जात होते. मात्र पाथर्डी राहुरीच्या दुष्काळी भागाला त्याचा काहीही उपयोग होत नव्हता.

# अकारी पडीत जमीनींच्या निर्णयाची महिनाभरात अंमलबजावणी

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची ग्वाही



**श्रीरामपूर : प्रतिनिधी**

**श्रीरामपूर तालुक्यातील अकारी पडीत जमीनी शेतकऱ्यांना पुन्हा देण्याबाबत झालेल्या निर्णयाची अंमलबाजावणी महिन्याभरात पूर्ण करण्याची ग्वाही महसूल तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.**

जिल्हाधिकारी कार्यालयात आकारी पडीत जमीन मालक शेतकऱ्यांनी शुक्रवारी मंत्री विखे पाटील यांची भेट घेवून त्यांचा सत्कार केला.याप्रसंगी शेतकऱ्यांशी संवाद साधला सर्वाच्या योगदानामुळे यश मिळाल्याचे सांगून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अजित पवार यांचेही सहकार्य मोठे असल्याचे विखे पाटील यांनी आवर्जून सांगितले.

अकारी पडीत जमीनींच्या संदर्भात प्रशासकीय आणि न्यायालय स्तरावर अनेक वर्षे प्रश्न प्रलंबित होता. तालुक्यातील सुमारे साडेसात हजार एकर जमीनींच्या संदर्भात असलेल्या प्रश्नाच्या बाबत शेतकऱ्यांना अनेक वर्षानुवर्षे संघर्ष करावा लागला.

राज्यात महायुतीचे सरकार आल्यानंतर खंडकरी शेतकऱ्यांप्रमाणेच अकारी पडीत जमीनींच्या संदर्भात सुध्दा तातडीने निर्णय होण्याकरीता महसूल मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी मंत्रालयात सातत्याने बैठका घेवून शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने निर्णय होईल अशी भूमिका घेतली होती. संभाजीनगर उच्च न्यायालयात याबाबत दाखल झालेल्या याचिकेमध्ये सुध्दा सरकारने प्रभावी बाजू मांडून शेतकऱ्यांना न्याय कसा मिळेल हीच भूमिका घेतली होती.सरकारच्या भूमिकेवर न्यायालयानेही सकारात्मक निर्णय दिल्याने शेतकऱ्यांना न्याय मिळाला असल्याचे विखे पाटील म्हणाले.

राज्यात महायुती सरकार आल्यानंतर याबाबत वेळोवेळी मंत्रालय स्तरावर झालेल्या बैठका, न्यायालयीन लढाईत मांडली गेलेली सकारात्मक भूमिका यासर्वांचे यश हे आता शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहीले.यापुर्वी स्व.बाळासाहेब विखे पाटील यांच्यासह अनेक शेतकऱ्यांना यासाठी संघर्ष करावा लागला होता.तालुक्यातील सुमारे नऊ गावातील शेतकऱ्यांना त्यांच्या जमीनी पुन्हा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून, न्यायालयाने आठ आठवड्यांची मुदत दिली असली तरी विधानसभेच्या निवडणुकीपुर्वी या जमीनी शेतकऱ्यांना देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

# १० लाख रुपयांची डाळिंब चोरणाऱ्या तिघांना अटक

## सापळा रचून आरोपींना घेतले ताब्यात

**राहाता : प्रतिनिधी**

**राहाता तालुक्यातील मापारवाडी येथील शेतकऱ्याच्या शेतातील १० लाख रुपये किमतीची डाळिंबे चोरणाऱ्या तीन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले. त्यांचे सात साथीदार मात्र पसार आहेत. आदिनाथ गोविंद माळी (वय २५, रा. धानोरा झरेकाठी, ता. संगमनेर), अमोल नामदेव पवार (वय २४, रा. म्हैसगाव, ता. राहुरी) व आनंद संजय पवार (वय १९, रा. चिंचोली फाटा, ता. राहुरी) अशी जेरबंद आरोपींची नावे आहेत.**

मापारवाडीतील विजय मापारी यांच्या तीन एकर शेतात १४ टन डाळिंब आले होते. या डाळिंबांची चोरी झाल्याची फिर्याद विजय मापारी यांनी




लोणी पोलीस ठाण्यात दिली होती. त्यानुसार पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल करून घेतला होता. जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी या प्रकरणाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे दिला होता. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने लोणी व राहाता परिसरातील रेकॉर्डवरील आरोपींची माहिती घेण्यास सुरूवात केली.

त्यावेळी पथकाला माहिती मिळाली की, डाळिंब चोरीचा गुन्हा आदिनाथ माळी व त्याच्या साथीदारांनी केला आहे. तो व त्याचे दोन साथीदार सध्या राहुरी तालुक्यातील चिंचोली फाटा येथे एका चहाच्या टपरीवर बसले आहेत. त्यानुसार पथकाने सापळा रचून तीनही आरोपींना ताब्यात घेतले.

पथकाने विचारपूस केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. तसेच त्याच्या आणखी सात साथीदारांची नावे सांगितली. यात अविनाश सुभाष माळी, अजय जालिंदर माळी, शंकर पवार (सर्व रा. चिंचोली फाटा, ता. राहुरी), विकास काळे, पवन मधे, आकाश काळे (तिघे रा. म्हैसगाव, ता. राहुरी) व अवी गवळी (रा. गोदावरी वसाहत, ता. राहुरी) अशी पसार आरोपींची नावे आहेत. पथकाने पुढील तपासासाठी जेरबंद आरोपींना लोणी पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

(पान १ वरून)

### लाडक्या बहिणीचे पैसे भावाच्या खात्यावर जमा !

पुरुषाच्या खात्यात रक्कम जमा झाल्याने प्रशासनाच्या कारभारावर आश्चर्य व्यक्त केलं जात आहे.
बँक खात्यात योजनेचे पैसे जमा झाल्यानंतर जाफर शेख म्हणाला की, सरकारच्या लाडकी बहीण योजनेंतर्गत महिलांच्या खात्यात तीन हजार रुपये जमा होत आहेत. तसाच एक मेसेज माझ्या मोबाईलवर आला आणि माझ्या बँक ऑफ बडोदाच्या खात्यात तीन हजार जमा झाल्याचं समजलं. हे खातं मी २०१२ मध्ये उघडलं होतं. मात्र बँक गावापासून दूर असल्याने व्यवहार करत नाही. मोबाईलवर मेसेज पाहून मी यवतमाळला गेलो आणि बँकेचे स्टेटमेंट घेतलं. त्यानंतर समजलं की, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे तीन हजार रुपये माझ्या खात्यावर जमा झाले आहेत. मात्र, यासाठी मी कोणताही अर्ज केलेला नाही. कुठेही कागदपत्रे दिली नाही. तरीही हे पैसे कसे जमा झाले याची चौकशी व्हावी, अशी मागणी जाफर शेख याने केली आहे.

### एका तरी बहिणीचा फॉर्म रद्द करून दाखवाच !

दाखवाच, असा इशारा सुप्रिया सुळेंनी दिला आहे.
काय आहे व्हॉट्सअपवर पाठवलेला कथित धमकीचा मेसेज?
मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थी महिलांना लाभाची रक्कम अदाकरणाच्या अनुषंगाने शनिवारी दिनांक १७ ऑगस्ट २०२४ रोजी श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल बालेवाडी स्टेडियम पुणे येथे राज्यस्तरीय शुभारंभाचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. तरी ज्या महिलांनी हा फॉर्म भरला आहे व त्याचे अ‍ॅप्रोव्हड मेसेज आला आहे त्यांनी या कार्यक्रमाला हजर राहावे.

यासाठी पुणे महानगरपालिकेने अहिल्याबाई होळकर बचत गट हॉल सुखसागर पोलीस चौकी येथून निघण्यासाठी बसची व्यवस्था केलेली आहे. तसेच अल्पोपहाराची पण व्यवस्था केलेली आहे. शनिवारी सकाळी ९.३०- वाजता अहिल्यादेवी होळकर बचत गट हॉल पोलीस चौकी येथून बसची सोय केलेली आहे. या कार्यक्रमाला हजर राहण्यासाठी नाव नोंदणी आवश्यक आहे. सर्वांनी येणे आवश्यक आहे. ज्या महिला येणार नाहीत त्यांचा फॉर्म रद्द होईल.

### ‘सरकारची धाकधूक आणि पाकपूक वाढली आहे म्हणूनच’

व्हायला लागलं आहे म्हणूनच
“जी ऑक्टोबरमध्ये व्हायची, ती नोव्हेंबरमध्ये होण्याची शक्यता निर्माण झाली, कारण पोराला कळलं महाराष्ट्राची जनता नापास होणार आहे म्हणून महायुती सरकारनं त्यांच्या दिल्लीतील पिताश्रींना सांगितलं, तेवढं निवडणूक आयोगाला सांगा, कुठलातरी क्लॉज वापरा.१५ वर्ष हरियाणा आणि महाराष्ट्राची निवडणूक बरोबर व्हायची, यंदा पहिल्यांदाच महाराष्ट्राची निवडणूक हरियाणाबरोबर होत नाही. माननिय निवडणूक आयोगानं पाऊस पितृपक्ष, गणेशोत्सव, दिवाळी कितीही कारणं दिली असली, तरी महाराष्ट्रातील जनतेला ठाऊक आहे, सरकारचं धाकधूक धाकधूक आणि पाकपूक व्हायला लागलंय आणि म्हणूनच निवडणूक पुढे ढकलली.” असा दावा अमोल कोल्हेंनी केला.




## वाचकांच्या लेखणीतून

### केरू बाळा नाईक आणि मंडळी

केरू बाळा नाईक. गावात त्या काळी त्याला केरू रामोशी म्हणूनच ओळखीत. पांढरा फेटा. मांजरपाटाचा नेहरू सदरा. मांजरपाटाचेच धोतर. काळसर वर्ण. चेहऱ्यावर किंचित देवीच्या व्रणांची झाक दिसे.मध्यम उंची. पायात चामड्याच्या साध्या वहाणा. अक्कडबाज मिशा. असे त्याच्या कदकाठीचे वर्णन करता येईल. मवाळ स्वभाव होता.
झाडे पाडणे, कापणे किंवा लाकडे फोडणे हेच त्याचे मजुरीचे काम असे. परंपरेने त्याला मिळालेल्या कु-हाडीचा कालमानानुसार असा वापर होत होता.
तो मूळचा आमच्या निघोज गावचा नव्हता. तरी बरीच वर्षं आमच्या गावात येऊन राहिल्याने तो इथलाच वाटे. तो परगावातून येऊन आमच्या गावात स्थायिक झाला होता. त्याला बायको होती; पण ती त्याची दुसरी बायको होती म्हणतात. ती खुरपणी, कापणी अशी शेतमजुरीची कामे ती करीत असे. स्वभावाने चांगली होती. मला मुलासमानच मानीत असे. माझ्याशी बोलताना अरे पोरा असेच संबोधन वापरायची. पोरा या एका शब्दापुढे आमच्यातील मराठा आणि रामोशी असा भेदभाव उरत नसे.



या जोडप्याला संतान बहुधा नसावीच. नीट आठवत नाही. कारण मी त्यावेळी फार लहान होतो.
केरू आमच्याच आळीला भाड्याच्या घरात राहत होता. केरूला दारूचे व्यसन होते. रात्री बायकोला तो शिवीगाळ करीत असे.
त्या काळी गावात ग्रामपंचायतीचा रेडिओ असे. कधी कधी मी तो मन लावून ऐकत असे.
एक दिवस संध्याकाळी सहा साडेसहाची वेळ असावी. ग्रामपंचायतीच्या रेडिओवर पुकारण्यात आले, आता केरू बाळा नाईक आणि मंडळी, निघोज यांचे भेदिक गायन सादर होईल. गायन एवढे समजले नाही. पण केरू आणि त्याच्या साथीदारांचा आवाज गोड होता. तो चांगलाच लक्षात राहिला.
या घटनेमुळे केरूविषयी मला अभिमान वाटू लागला. कारण पुणे आकाशवाणीवर आपल्या गावचा लौकिक या कलाकाराने वाढवला होता. त्याच्या जोडीला लक्ष्मण लाळगे आणि आणखी एकजण होता. त्याचे नाव आठवत नाही. ही मंडळी कलगी (शक्ती) पक्षाची होती.
ही मंडळीस गावात किंवा आसपासच्या पंचक्रोशीत एखाद्याच्या घरी जन्मलेल्या नवीन बालकांची पाचवी गाजविण्याची सुपारी मिळे. त्यात भेदिक गायनाचे कार्यक्रम करीत. त्यातून त्यांना चांगली बिदागीही मिळत असे. सणवारी किंवा यात्राखेत्रांतून कलगीतुऱ्याचे जंगी सामने होत. त्यांतही ही मंडळी समरसून सामील होत असत. ते आमच्या गावाचे नाव आसपासच्या पंचक्रोशीत गाजवीत. त्यामुळे या मंडळींचा आम्हाला अभिमान वाटे!
पुढे महाविद्यालयीन शिक्षणासाठी मी मुंबईला निघून आलो. आता त्याला साठपासष्ट वर्षे झाली. केरू बाळा नाईक आणि मंडळी आता या गावात दिसत नाहीत. किंबहुना ती या जगात उरलीच नसावीत! आता उरल्यात त्या फक्त त्यांच्या जिवाला हुरहूर लावणाऱ्या आठवणी!
**यादें रह जाती हैं डसने के लिए।**
**दिन तो आते हैं गुज़र जाते हैं।।**

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.



# सुनील राजदेव नांदूरपठारचे उपसरपंच

## स्वातंत्र्यदिनी झाली बिनविरोध निवड

नांदुरपठार : प्रतिनिधी

**नांदूरपठार ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी सुनील राजदेव यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडीनंतर ग्रामस्थांच्या वतीने राजदेव यांचा सत्कार करण्यात आला.**

हरी देशमाने यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या उपसरपंचपदावर राजदेव यांची निवड करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. निवडीनंतर बोलताना राजदेव म्हणाले, खा. नीलेश लंके तसेच जिल्हा परिषदेच्या मा. सदस्या राणीताई लंके यांच्या मार्गदर्शनाखाली नांदूरपठारमध्ये मोठया प्रमाणावर विकास कामे झाली आहेत. स्वातंत्र्यानंतर प्रथमच नांदूरपठारमध्ये विकासाची गंगा अवतरली असून त्याचे संपूर्ण श्रेय खा. नीलेश लंके यांना जाते. यापुढील काळातही उर्वरीत विकास कामे मार्गी लावण्यासाठी सरपंच श्रामीनी चौधरी व सदस्यांच्या मदतीने पाठपुरावा करण्याची ग्वाही राजदेव यांनी दिली.

सत्काराप्रसंगी सरपंच श्रामीनी चौधरी, संदीप चौधरी, रविंद्र राजदेव, मा. मुख्याध्यापक रामदास वलवे, सुरेश आग्रे, नारायण आग्रे, मदन देशमाने, नारायण राजदेव, नितीन आग्रे, रोहिदास चौधरी, गोरख पानसरे, शिवाजी घोलप, शशिकांत आग्रे, प्रशांत पानसरे, दीपक देशमाने, बाबाजी चौधरी सर ,दिलीप महाराज चौधरी ,विजय बोनटे, ग्रामसेवक सांगळे, मुख्याध्यापक आढाव, वाळुंज गुरूजी, जाधव गुरूजी, पंढरी आग्रे, यांच्यासह महिला, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होते.



नांदूरपठारच्या उपसरपंचपदी सुनील राजदेव यांची निवड झाल्यानंतर ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

### स्वयंपूर्ण नांदुरपठारचे स्वप्न

**खा. नीलेश लंके यांच्या माध्यमातून स्वातंत्र्यानंतर प्रथमच नांदूरपठारमध्ये मोठया प्रमाणावर विकास कामे झाली आहेत. उर्वरीत विकास कामे मार्गी लावून स्वयंपूर्ण नांदुरपठारचे आमचे स्वप्न आहे. खा. नीलेश लंके यांच्या माध्यमातून हे स्वप्न पुर्ण होईल याचा विश्‍वास आहे.**

**श्रामीनी संदीप चौधरी**
सरपंच, नांदूरपठार

### पेव्हर ब्लॉकच्या कामाचा शुभारंभ

**स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून गावामध्ये पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना नीलेश लंके प्रतिष्ठाणच्या वतीने स्कुल बॅगचे वितरण करण्यात आले.**

# स्वातंत्र्याचे मोल मोठे, त्याची जाण ठेवा!

## रामराव गाडेकर यांचे प्रतिपादन । पोदार लर्न स्कुलमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात

पारनेर : प्रतिनिधी

**भारताला ब्रिटीशांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी शेकडो स्वातंत्र्य विरांनी बलीदान दिले असून स्वातंत्र्याचे मोल मोठे असल्याने प्रत्येकाने त्याची जाण ठेवली पाहिजे असे प्रतिपादन गुरूमाऊली पोदार लर्न स्कुलचे अध्यक्ष रामराव गाडेकर यांनी केले.**

शिवमावळे कृतज्ञता प्रतिष्ठाण संचलित गुरूमाउली पोदार लर्न स्कुलमध्ये देशाचा ७८ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात संपन्न झाला. त्यावेळी गाडेकर यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

गाडेकर म्हणाले, स्वातंत्र्य हा शब्द गोड वाटत असला तरी ते मिळविण्यासाठी अनेक शुर विरांनी आपले रक्त सांडले आहे. प्राणाची बाजी लावलेली आहे. ३५० वर्षांपूर्वी हिंदुस्तानला गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी शिवराज नावाचा सुर्य स्वातंत्र्याची पहाट घेऊन येतो व गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त करतो. हाच शिवरायांचा इतिहास, पराक्रम अनेक पराक्रमी विरांसाठी प्रेरणादायी ठरतो. हीच प्रेरणा घेऊन भारत देश १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. त्यामुळेच स्वातंत्र्याचे मोल फार मोठे आहे. त्याची प्रत्येकाने जाण ठेवली पाहिजे असे गाडेकर म्हणाले. नगरसेविका प्रियंका औटी, सुभाष शिंदे, रेश्मा कळमकर यांचीही यावेळी भाषणे झाली.

रामराव गाडेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले तर संस्थेचे सचिव मच्छिंद्र मते यांच्या हस्ते भारत मातेच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांनाही विशेष निमंत्रीत पाहुणे म्हणून बोलविण्यात आले होते. संस्थेच्या वतीने विद्यार्थी व पालकांना सुरुची भोजन देण्यात आले. यावेळी संस्थेचे खजिनदार काशिनाथ फंड, उपाध्यक्ष रावसाहेब कासार, विश्‍वस्त विकास दळवी, दत्तात्रेय आंबुले, किसन महाराज बुगे यांच्यासह प्राचार्य विठ्ठल तुपे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




७८ वा स्वातंत्र्य दिन गुरूमाऊली पोदार लर्न स्कुलमध्ये मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.

### देशभक्तीपर गिते आणि नृत्य

**स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतीक कार्यक्रम सादर करीत उपस्थितांची वाहवा मिळविली. देशभक्तीपर गितांबरोबरच सादर करण्यात आलेल्या नृत्याला उपस्थितांनी दाद दिली.**

# लाडक्या बहिणींची बँकेत गर्दी!

## सुभाष सासवडे यांनी घेतली शाखाधिकाऱ्यांची भेट



टाकळी ढोकेश्‍वर : प्रतिनिधी

**मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी शासन काम करत आहे. या योजनेच्या माध्यमातून पारनेर तालुक्यातील महिलांना मोठ्या प्रमाणात लाभ होणार आहे.मात्र आधार कार्ड बँकेला लिंक करण्यासाठी लाडक्या बहिणींची बँकेत मोठी गर्दी होत आहे.**

पारनेर तालुक्याच्या उत्तर भागातील पोखरी, देसवडे, खडकवाडी, पळशी, वनकुटे, वडगाव सावताळ, तिखोल, धोत्रे, ढोकी, वासुंदे, कर्जुले हर्या, सावरगाव, पळसपुर या भागातून मोठ्या प्रमाणात महिला बँक अकाउंट आधार लिंक व्हेरिफिकेशन साठी स्टेट बँकेमध्ये येत आहेत. टाकळी ढोकेश्‍वर शाखेमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे.

परिसरातील महिलांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना समितीचे पारनेर तालुका सदस्य युवा सेना तालुकाप्रमुख सुभाष सासवडे व भाजपा जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी रोकडे, शिवसेना युवा सेना टाकळी ढोकेश्‍वर विभाग प्रमुख अक्षय गोरडे यांनी टाकळी ढोकेश्‍वर येथील स्टेट बँकेचे शाखा अधिकारी यांना भेटून येणाऱ्या समस्या संदर्भात माहिती जाणून घेतली व महिलांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी योजनेचे सदस्य सुभाष सासवडे यांनी पूर्णतः प्रयत्न करणार आहे. त्यासाठी आमची टीम कार्यरत असून या पुढील काळात योजनेची महिलांना तात्काळ सेवा उपलब्ध करून देणार असल्याचे सांगितले.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व राज्याचे महसूल मंत्री नगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी खासदार डॉ.सुजय विखे पाटील मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना समितीचे पारनेर तालुकाध्यक्ष सुनील थोरात यांच्या माध्यमातून लाडकी बहीण योजना पारनेर तालुक्यात सक्षमपणे राबवली जात आहे या योजनेच्या माध्यमातून पारनेर तालुक्यातील ९ हजारापेक्षा जास्त महिलांना बँक अकाउंट वर पैसे सुद्धा जमा झाले आहे. त्यामुळे सर्वसामान्य महिला वर्गामध्ये आनंदाचे वातावरण असल्याचे लाडकी बहीण योजना समितीचे सदस्य सुभाष सासवडे यांनी सांगितले.


# डी.बी.एम.शाळेतील विद्यार्थिनींनी पाठविल्या सीमेवरील सैनिकांसाठी राख्या!

## देशभक्तीचा एक अनोखा उपक्रम

राळेगण सिद्धी : प्रतिनिधी

**भाऊ-बहिणीच्या नात्याचा पवित्र असलेला रक्षाबंधन सण अवघ्या काही दिवसांवर असताना राळेगण सिद्धी येथील डी.बी.एम स्कूलच्या विद्यार्थिनींनी एक राखीसैनिकांसाठी'उपक्रमात सहभागी होऊन देशाच्या सीमेवर संरक्षणासाठी तैनात असणाऱ्यासैनिकांप्रतिकृतज्ञता व्यक्त केली आहे.**

विद्यार्थिनींनी खाऊच्या पैशातून हळूहळू बचत करून या राख्या तयार केल्या आहेत. प्रत्येक राखीमध्ये त्यांचं बंधुप्रेम आणि नात्याच्या बंधाचा गोड भावनिक धागा गुंफलेला आहे. या राख्या ''मराठा लाइट इन्फंट्री रेजिमेंटच्या'' जवानांसाठी पाठविण्यात आल्या असून प्रत्येक विद्यार्थिनीने आपल्या सैनिक भावाला राखी सोबत संदेश लिहून पाठवले आहेत ज्यात त्यांनी जवानांना त्यांच्या शौर्य,त्याग अणि पराक्रमासाठी धन्यवाद दिले आहेत. खाऊच्या पैशातून मुली सैनिकांसाठी राख्या तयार करतात, याचा पालकांना देखील अभिमान वाटतो. राख्या पाठवण्याचे यंदाचे हे शाळेचे सलग १० वे वर्ष आहे.




शाळेचे प्राचार्य जे.डी.मापारी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली शितल मापारी व सर्व शिक्षकांनी एकत्रितपणे या उपक्रमाला एक विशिष्ट दिशा दिली. त्यांच्या मार्गदर्शन आणि प्रयत्नांमुळे विद्यार्थिनींना उपक्रमाचे महत्त्व समजले आणि देशसेवेची प्रेरणा मिळाली. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये देशभक्तीची भावना अधिक दृढ झाली असून, त्यांनी राख्यांच्या माध्यमातून आपल्या बंधू प्रेमाची आणि देशभक्तीची अभिव्यक्ती हृदयस्पर्शी पद्धतीने केली आहे.

या उपक्रमामध्ये विद्यार्थिनींनी आपल्या हातांने एकेक राखी बनवून त्यामध्ये आपल्या भावनांचा आणि स्नेहाचा अंश मिसळला आहे. या राख्यांवर भारताचा तिरंगा, मराठा रेजिमेंटचे प्रतीक, तसेच जवानांच्या शौर्याचे प्रतिकात्मक चिन्हे दर्शविण्यात आली आहेत.मेजर ज्ञानेश्‍वर मापारी (माऊली मेजर) यांनी या राख्या स्वीकारताना डी.बी.एम स्कूलच्या विद्यार्थिनींनी चे व त्यांच्या या देशभक्तीपूर्ण उपक्रमाचे विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या राख्या व शुभेच्छा पत्र पोस्टाद्वारे पाठविण्यात आले आहेत.

या राख्या जेव्हा जवानांना मिळतील, तेव्हा त्यांच्या मनात आपुलकीची आणि देशभक्तीची भावना अधिक प्रबळ होईल. या उपक्रमामुळे जवानांना राख्यांचे प्रतीकात्मक बंधन अनुभवता येईल आणि ते आपल्या देशासाठी लढण्याच्या प्रेरणेला अजून अधिक बळ देतील.या नावीन्यपूर्ण उपक्रमासाठी डी.बी.एम.शाळेचं पंचक्रोशीत सर्वत्र प्रशंसा आणि कौतुक होत आहे.

# सेट परिक्षेत पारनेर महाविद्यालयाच्या प्राध्यापक, विद्यार्थ्यांचा झेंडा !

## महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा पुन्हा अधोरेखित

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजचे प्राध्यापक तसेच विद्यार्थ्यांनी सेट परिक्षेत घवघवीत यश संपादन करून महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा अधोरेखित केला. प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांनी ही माहीती दिली.**



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून वरिष्ठ महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापकपदाच्या पात्रतेसाठी आवष्यक असलेली परीक्षा मार्च महिन्यात घेण्यात आली होती. या परीक्षेत महाविद्यालयातील बी बी ए सी ए विभागाचे प्रमुख प्रा. रणजित शिंदे हे संगणकशास्त्र विषयात सेट परीक्षा उत्तीर्ण झाले. यापूर्वी ते अर्थशास्त्र व वाणिज्य या विषयातून ही परीक्षा उत्तीर्ण झाले होते. आजी माजी विद्यार्थ्यांपैकी रूपाली मोकाते भौतिकशास्त्र, नुतन मांडगे गणित, अखिलेश भंडारे रसायनशास्त्र, योगिता थोरात रसायनशास्त्र, चौताली बरशिले गणित, संकेत ठाणगे संगणकशास्त्र, जाफर शेख भौतिकशास्त्र तर सुवर्णा रोहोकले हिंदी विषयातून सेट परीक्षेत यश संपादन केले.

प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष विवेक भापकर, सचिव ॲड. विश्‍वासराव आठरे, सहसचिव जयंत वाघ, खजिनदार ॲड. दिपलक्ष्मी म्हसे, प्राचार्य लक्ष्मणराव मतकर, डॉ तुकाराम थोपटे यांनी अभिनंदन केले.

# निघोजला रविवारी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती

## खासदार लंके,आ.गोरखे यांची उपस्थिती

निघोज : प्रतिनिधी



**निघोज येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती कमीटीच्या वतीने रविवार दि.१८ रोजी दुपारी तीन वाजता लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृहात जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमात खासदार नीलेश लंके यांच्या हस्ते तसेच विधानपरिषदेचे आमदार अमित गोरखे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न होणार आहे.**

गेली अनेक वर्षांपासून निघोज परिसरातील मातंग समाज बांधव व ग्रामस्थ लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करीत आहेत. जयंतीदिनी कार्यक्रम साजरा करीत असतात शिवाय प्रमुख मान्यवरांना संपर्क करीत हा जयंती सोहळा मोठ्या प्रमाणात कशाप्रकारे साजरा करता येईल याचे नियोजन करीत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचाराची शिकवण लोकप्रबोधन करीत जयंती सोहळा साजरा करण्याचे काम करीत असतात.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या भाषणातून मार्गदर्शन होणार असून रविवार दि.१८ रोजी होणाऱ्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती कार्यक्रमास ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जयंती कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

# डॉ.श्रीकांत पठारे यांची आरोग्यसेवा पारनेर तालुक्याला वरदान ठरतेय !

## डॉ.श्रीकांत पठारे बनलेत सर्वसामान्यांसाठी आरोग्यदूत ! आरोग्यशिबिरांच्या माध्यमातुन हजारो रुग्णांना दिलासा देणारे डॉ.श्रीकांत पठारे !

पारनेर : प्रतिनिधी



**पारनेर तालुका हा तसा शिक्षणाच्या बाबतीत प्रगत तालुका आहे. काही भागात बागायती शेती पण चांगली येते. पण काही भाग हा दुष्काळी आहे. काही भाग दुर्गम आणि डोंगराळ आहे. तालुक्यातील मुख्य गावांमध्ये येण्यासाठी गोरगरीब जनतेला जरा जिकिरीचा असणारा काही भाग काही प्रमाणात सोयीसुविधांनी मागे आहे. आरोग्यसेवेच्या बाबतीत काही प्रमाणात आरोग्यसेवा पोहचली आहे पण काही प्रमाणात अडीअडचणींचा सामना करावा लागत आहे.**

डॉ.श्रीकांत पठारे व त्यांच्या पत्नी डॉ. पद्मजा पठारे हे गेली २४ वर्ष पारनेर शहरात आरोग्यसेवेच्या माध्यमातुन काम करतात. तसेच त्यांचे मोठे बंधु डॉ.बाळासाहेब पठारे व वहिनी डॉ.नीता पठारे हे दांपत्य पण सुपा शहरात गेली २७ वर्ष आरोग्यसेवेच्या माध्यमातुन उत्कृष्ट काम करतात. तसेच त्यांचे लहान बंधु प्रमोद पठारे हे पत्नी मंगल पठारे यांच्या साथीने आरोग्यसेवेच्या या कामात त्यांच्या दोन्ही बंधूंना मदत करत आहेत. परंतु आपण ज्या सर्वसामान्य कुटुंबातून आलो त्याची जाणीव ठेवून डॉ.पठारे बंधु हे कायम सर्वसामान्यांचे अश्रू पुसण्याचे काम करतात. अडलेल्या गोरगरीब जनतेला कायम आधार देणारे डॉ.पठारे बंधु डॉक्टरांच्या रुपातील देवमाणसेच ! पैशाभावी कोणत्याही रुग्णाची सेवा थांबणार नाही याचा कायम दंडक त्यांनी स्वतः ला घालून घेतला आहे. कोणताही आजार असो आणि कितीही खर्च असो त्याची कोणत्याही रुग्णाने चिंता न करता आपल्या दवाखान्यातून बरे होऊन बाहेर गेले पाहिजे आणि त्या रुग्णाला कोणतीही अडचण आली नाही पाहिजे अशी सेवा देण्याचे काम पठारे बंधु करतात.

गेली अनेक वर्ष विविध मोफत आरोग्यशिबिरांच्या माध्यमातुन डॉ. श्रीकांत पठारे यांनी लाखो रुग्णांची सेवा करण्याचे काम केले आहे. तसेच हजारो रुग्णांच्या विविध शस्त्रक्रिया मोफत करण्याचे कामही विविध संस्थांच्या माध्यमातुन केले आहे. तालुक्यातील डोंगराळ, दुर्गम, मागास भागात डॉ.श्रीकांत पठारे यांनी आपल्या आरोग्यसेवेचा लाभ मिळवून देण्यासाठी गेली अनेक वर्ष विविध आजारांवर मात करण्यासाठी व नागरिकांना सुदृढ आरोग्य मिळवून देण्यासाठी विविध आरोग्यशिबिरे मोफत घेण्याचे काम केले आहे. त्यातुन निदान झालेल्या रुग्णांना मोफत शस्त्रक्रिया करण्यासाठी आपल्या माध्यमातुन विविध संस्थांच्या मदतीने विविध ठिकाणी पाठवून मोफत उपचार देखील उपलब्ध करुन दिले आहेत.

डॉ.श्रीकांत पठारे व डॉ.पद्मजा पठारे हे राजकारणात सक्रिय आहेत. डॉ.श्रीकांत पठारे हे माजी पंचायत समिती सदस्य आहेत आणि सध्या शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुकाप्रमुख म्हणून अतिशय उत्कृष्ट पद्धतीने काम पाहत आहेत तसेच येणाऱ्या विधानसभेला महाविकासआघाडीमधून उमेदवारीचे प्रबळ दावेदार आहेत. तसेच डॉ.पद्मजा पठारे या कृषी उत्पन्न बाजार समिती पारनेरच्या संचालिका असून राज्यात सर्वाधिक मताने त्या निवडून आल्या आहेत. त्याही उत्कृष्ट पद्धतीने शेतकऱ्यांची कामधेनू असलेल्या बाजार समितीत बळीराजासाठी तळमळीने काम करत आहेत. डॉ. पठारे दांपत्य हे राजकारणाबरोबर समाजकारणात अतिशय जबाबदारीने काम करत आहे आणि दीनदुबळ्या घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी कायम अग्रेसर आहे. आपल्या दवाखान्यात आलेल्या रुग्णांची अस्थेवाईकपणे चौकशी करुन त्याचे निदान व्यवस्थीत होण्याबरोबर त्याला मायेचा आधार देण्याचे काम डॉ.पठारे दांपत्य करत असते.

जगावर आलेल्या कोरोना सारख्या महामारीत डॉ.श्रीकांत पठारे यांनी पहिले मोफत कोविड केअर सेंटर पारनेर शहरात सुरु केले होते. त्यात लहान मुलांच्या सोयीसाठी त्यांनी विशेष सुविधा उपलब्ध करुन दिल्या होत्या. कोरोनासारख्या भयावह महामारीत आपल्या जीवाची पर्वा न करता तालुक्यातील जनतेला वाचविण्यासाठी दिवसरात्र डॉ.श्रीकांत पठारे व त्यांच्या पत्नी डॉ.पद्मजा पठारे यांनी जीवाची बाजी लावून रुग्णसेवा केली, त्याची जाणीव ठेवून आजही विविध नागरिक त्यांना आशीर्वाद देत आहेत. डॉ.श्रीकांत पठारे व कुटुंबिय कायमच तालुक्याच्या जडणघडणीत आपली मोलाची भूमिका बजावत असून त्यांच्या सेवाभावी वृत्तीचा प्रत्येय तालुक्यातील अनेक नागरिकांना वेळोवेळी आला आहे आणि त्यांच्या याच स्वभावाने ते तालुक्यातील जनेतच्या गळ्यातील ताईत बनले आहेत. तसेच सर्वसामान्यांचा आधार बनलेल्या डॉ.श्रीकांत पठारे यांना तालुक्यातील जनसामान्य देवदूत म्हणत असून आरोग्यसेवेतील गोरगरीबांचा आरोग्यदूत म्हणून डॉ.श्रीकांत पठारे यांची ख्याती निर्माण झाली आहे.

# दुर्गम भागाच्या विकासासाठी कटीबद्ध - सुजित झावरे पाटील



पळशी : प्रतिनिधी

**तालुक्यामधील विविध दुर्गम भागात मोठया संख्येने आदिवासी बांधव वास्तव्यास असून आदिवासी बांधवांना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी या भागाच्या विकासासाठी आपण कटीबध्द असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मा. उपाध्यक्ष सुजित झावरे यांनी केले.**

पारनेर तालुक्याचे शेवटचे टोक असलेल्या अतिदुर्गम नागापुरवाडी येथील नागापुरवाडी ते काळा माथा रस्ता तसेच नागापुरवाडी ते मांडवे रस्ता खडीकरण या कामांसाठी सुजित झावरे पाटील यांच्या प्रयत्नांतून प्रत्येकी १८ लाख रूपयांचा निधी मंजुर करण्यात आला. या कामांचे झावरे यांच्या हस्ते भुमिपुजन करण्यात आले. त्यावेळी त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

यावेळी बोलताना झावरे पाटील म्हणाले, आदिवासी बांधवांचे जीवन सुकर करण्यासाठी मा. आ. स्व. वसंतराव झावरे यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाच्या विविध योजना तळागाळापर्यंत राबविल्या. आजही आदिवासींसाठीच्या योजना राबविण्यासाठी आपण प्रयत्नशिल असून प्रत्येक आदीवासी बांधवांना योजनांचा लाभ मिळाला पहिजे. कोणीही योजनांपासून वंचित राहू नये यासाठी प्रयत्न केले जात असल्याचे झावरे म्हणाले.

यावेळी अमोल साळवे, पळशीचे माजी सरपंच मिठूशेठ जाधव, माजी सरपंच संतोष जाधव, इंदुमती मेंगाळ, वामन मधे, विष्णू मधे, शेखर साळवे, शंकर साळवे, खमा मेंगाळ, भाउसाहेब मेंगाळ, देवजी मेंगाळ, विजय पथवे, दुर्योधन मेंगाळ, खेमा पथवे, भगा मेंगाळ, तुकाराम मेंगाळ, पंकज गंडाळ, रामा मधे, नंदू पथवे, राजू पथवे, संतोष बिचकुले, दिनकर ढोकळे, गायखे गरूजी यांच्यासह पळशी, नागपुरवाडी येथील ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com